G.D.M. ARTS, K.R.N. COMMERCE & M.D. SCIENCE COLLEGE
JAMNER DIST JALGAON

जामनेर तालुका एज्युकेशन सोसायटीचे,
नॅक पुनर्मूल्यांकन तिसरी फेरी — बी. ग्रेड(२.८७)
गीताबाई दत्तात्रय महाजन कला,श्री.केशरीमल राजमल नवलखा वाणिज्य व मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविद्यालय,जामनेर जि.जळगांव.
ता.जामनेर,जिल्हा जळगांव.पीन—४२४२०६ फोन:२३००७८,२३१०७८ फॅक्स:२३१०७८ E-mail:
principalacscollegejamner@yahoo.com

दि. २१/०३/२०२३.

## अग्निवीर सैन्य दल भरती पूर्व प्रशिक्षण अभियान अहवाल

जा. ता. ए. सो. संचालित गिताबाई दत्तात्रय महाजन कला श्री केशरीमल राजमल नवलखा आणि मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व एन. सी. सी. विभागामार्फत दिनांक १३ मार्च २०२३ ते दिनांक १८ मार्च २०२३ दरम्यान अग्नीवीर सैन्य दल भरती पूर्व प्रशिक्षण अभियान आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये एकूण ७८ विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या प्रशिक्षणा साठी १८ महाराष्ट्र बटालियन जळगाव येथील लेफ्टनंट कर्नल पवन कुमार यांच्या मार्गदर्शनानुसार एन. सी. सी. अधिकारी लेफ्टनंट डॉ. अमर पवार व त्यांच्या टीमने पाच दिवस विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक आणि थेरॉटिकल माहिती देऊन प्रशिक्षित केले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये दररोज सकाळी ७:३० ते ८:३० या वेळेमध्ये विद्यार्थ्यांना सैन्यदल भरती आणि पोलीस भरती मध्ये आवश्यक असलेल्या शारीरिक परीक्षेच्या संदर्भातील सर्व प्रकारची तयारी करून घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने उंच उडी, लांब उडी, ठराविक कालावधीमध्ये धावणे, सूर्यनमस्कार इत्यादीचा समावेश होता. त्यानंतर स. ८:३० ते ९:३० या वेळेत विद्यार्थ्यांना थेरॉटिकल माहिती म्हणजेच, सामान्य ज्ञान, सामान्य गणित, सामान्य भूगोल इत्यादी विषयावर सखोल माहिती देण्यात आली. यादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना दररोज नास्त्याचीही व्यवस्था कण्यात आली होती. विद्यार्थ्यांची यादरम्यान लेखी परीक्षा घेण्यात आली. दिनांक १३ मार्च ते दिनांक १७ मार्च यादरम्यान वरील प्रमाणे दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण दिल्यानंतर दिनांक १८ मार्च २०२३ रोजी सदर कार्यक्रमाचा समारोप आयोजित करण्यात आला होता.

या समारोपाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नल पवन कुमार १८ महाराष्ट्र बटालियन जळगाव कॅप्टन डॉ. आर. आर. राजपूत फैजपूर महाविद्यालय, श्री दीपक पाटील आधीसभा सदस्य कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, आणि श्री नितीन झाल्टे व्यवस्थापन

परिषद सदस्य कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांना आमंत्रित करण्यात आले होते. या समारोप कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबाजी पाटील सर हे होते. सदर कार्यक्रमाच्या अगोदर सर्व प्रमुख पाहुण्यासमोर प्रशिक्षित विद्यार्थ्यांनी पाच दिवस घेतलेल्या प्रशिक्षणाचा सराव प्रदर्शित केला. निरोप समारंभाच्या कार्यक्रमात प्रा. डॉ. अरविंद राऊत (विद्यार्थी विकास अधिकारी) यांनी प्रास्ताविक सादर केले. सदर प्रशिक्षणात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी करण शिवाजी पाटील आणि दिव्या संजय लोणारी या दोन विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या पैकी लेफ्टनंट कर्नल पवन कुमार यांनी विद्यार्थ्यांनी चौफेर ज्ञान पूर्ण करून शारीरिक क्षमतांचा विकास करणे खूप आवश्यक आहे असे आपल्या भाषणात नमूद केले. कॅप्टन डॉ. आर. आर. राजपूत यांनी आपले मत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी आपल्याकडे असलेल्या कौशल्याचा विकास करून देशाच्या प्रगतीसाठी तयार असणे गरजेचे आहे आणि आजची पिढी हे उद्याचे भविष्य घडवित असते असे आपल्या भाषणात नमूद केले. यानंतर अध्यक्षीय मनोगतात माननीय प्राचार्यांनी एकूण पाच दिवस चाललेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी अश्या प्रकारच्या कार्यक्रमाची गरज असते त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांनेही कार्यक्रमच आनंद घेणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर त्यांना देण्यात आलेल्या प्रशिक्षणाबद्दल विद्यापीठाने आमच्या महाविद्यालयास संधी दिली त्याबद्दल धन्यवाद मानले आणि आमच्या महाविद्यालयाद्वारे विद्यार्थी केंद्रित कार्यक्रमांना नेहमी प्राधान्य देण्यात येईल असे आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी त्यांचे मत व्यक्त केले. यानंतर एन..सी..सी. विभागातील भूषण गोरे या विद्यार्थ्यांने सदर कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले आणि राष्ट्रगीतानंतर अध्यक्षाच्या परवानगीने कार्यक्रम संपन्न झाल्याचे घोषित केले सदर कार्यक्रमासाठी श्री निलेश झाल्टे व्यवस्थापन परिषद सदस्य कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी अरविंद राऊत, प्रा. डॉ. विजयेंद्र पाटील (अ. विद्यार्थी विकास अधिकारी), प्रा. संजय इंगळे, प्रा. डॉ. अक्षय घोरपडे यांनी सदर प्रशिक्षण आणि समारोप कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपस्थित राहून अपले योगदान दिले.

| | | | |
|---|---|---|---|
| सामन्वक<br>लेफ्ट. डॉ. अमर पवार | अ. विद्यार्थी विकास अधिकारी<br>प्रा. डॉ. विजेयेंद्र पाटील | विद्यार्थी विकास अधिकारी<br>डॉ. अरविंद राऊत | प्राचार्य<br>प्रा. डॉ. आबाजी पाटील<br>Offg. PRINCIPAL<br>G.D.M. Arts, K.R.N. Commerce and M.D. Science College Jamner, Dist. Jalgaon |

G.D.M. ARTS, K.R.N. COMMERCE & M.D. SCIENCE COLLEGE JAMNER DIST JALGAON

0lc

G.D.M. ARTS, K.R.N. COMMERCE & M.D. SCIENCE COLLEGE JAMNER DIST JALGAON

जामनेर तालुका एज्युकेशन सोसायटीचे,
(नॅक पुनर्मुल्यांकन तिसरी फेरी – बी++ ग्रेड (२.८७))
गीताबाई दत्तात्रय महाजन कला,श्री.केशरीमल राजमल नवलखा वाणिज्य व मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविद्यालय,जामनेर जि.जळगांव.—४२४२०६ फोन:२३००७८,२३१०७८
फॅक्स:२३१०७८ E-mail: principalacscollegejamner@yahoo.com

जा. क्र. दि.

प्रति,
संचालक सो.,
विध्यार्थी विकास विभाग क. ब. चौ. उ. म. वि. जळगाव.

विषय : अग्निवीर सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण अभियान अहवाल सदर करणे बाबत....

माननीय महोदय,

आपण आमच्या महाविद्यालयात विध्यार्थी विकास विभागमार्फत दि. १३/३/२०२३ ते १८/३/२०२३ दरम्यान अग्निवीर सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण अभियानासाठी परवानगी दिली होती. सदर कार्यक्रम विध्यार्थी विकास विभाग आणि एन. सी. सी. विभागाच्या वतीने पूर्ण करण्यात आला. विध्यापिठाने दिलेल्या निर्देशानुसार सदर कार्यक्रम आम्ही आयोजित केला होता. त्यासंदर्भाचा सविस्तर अहवाल आणि कार्यक्रमाच्या खर्चाचे विवरण करणारे पत्र पाठवीत आहोत त्याचा स्वीकार करावा. ही विनंती .

समन्वयक
(डॉ. अमर पवार)

प्राचार्य
(डॉ. आबाजी पाटील)
Offg. PRINCIPAL
G.D.M. Arts, K.R.N. Commerce
and M.D. Science College
Jamner, Dist. Jalgaon

सोबत: